ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतातील व महाराष्ट्रातील साखर कारखान्यातील ऊस गाळप, साखर उत्पादन, आणि साखर पुन:प्राप्तीचा/उतारा अभ्यास

पवार बब्रुवान शेषराव[1], डॉ. इंगोले रमेश जे.[2]

[1]संशोधक विद्यार्थी

[2]मार्गदर्शक

*Corresponding Author:* पवार बब्रुवान शेषराव

**DOI - 10.5281/zenodo.14880970**

**गोषवारा :**

*भारतामध्ये महाराष्ट्र हे साखर उत्पादनासाठी सर्वात उल्लेखनीय आणि मोठ्या प्रमाणात साखर उत्पादन करणारे राज्य आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग हा भारताच्या एकूण साखरेपैकी ४०% उत्पादन महाराष्ट्रात होते. गेल्या काही वर्षामध्ये साखर उत्पादनात साखर उत्पादनाच्या वाढीचा वेग वाढलेला दिसून येतो. महाष्ट्रातील साखर उत्पादनाच्या ताज्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे इतर राज्याच्या तुलनेत चांगले उत्पादन करत असलेले दिसून येते. महाराष्ट्रातील साखर उद्योग हा सहकारी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पसरलेला दिसून येतो. महाराष्ट्रातील उत्पादित एकूण पिकापैकी ऊस हे एक प्रमुख व नगदी पीक मानले जाते. सहकारी साखर कारखाने हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कान मानला जातो.*

***मुख्य शब्द : विकासात्मक प्रवृत्ती, उत्पादन, उपभोग, साखर पुन:प्राप्ती/उतारा.***

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती पाहता ऊस उत्पादनासाठीच्या आदर्श पट्ट्यामध्ये महाराष्ट्राचे स्थान असलेले दिसून येते. भारतातील इतर भागाच्या तुलनेत महाराष्ट्र हे ऊस उत्पादनासाठी भौगोलिक परिस्थिती चांगले असलेले राज्य आहे . उत्तरेकडील राज्यापेक्षा महाराष्ट्राचे स्थान आदर्श आहे. भारतातील उद्योगामध्ये महाराष्ट्रातील साखर उद्योग हा सर्वात प्रसिद्ध व मोठ्या प्रमाणावर साखर उत्पादन करणारा उद्योग मनाला जातो . अलीकडच्या काळातील साखर उत्पादनाची आकडेवारी पाहता महाराष्ट्रातील साखर उत्पादनाची आकडेवारी हि इतर राज्याच्या तुलनेत जास्त असलेले दिसून येते . महाराष्ट्र हे सहकारी साखर उद्योगासाठी प्रसिद्ध असलेले राज्य आहे. ऊस उत्पादन हे महाराष्ट्रातील इतर मुख्य पिका बरोबर प्रमुख पिक म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात साखर उद्योगाची स्थापना झालेली दिसून येते.

**महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा इतिहास :**

१९१९ मध्ये ब्रिटीश सरकारने बेलापूर साखर मील हरेगाव येथे नगर जिल्ह्यामध्ये सुरु केला. त्यानंतर आर . एन. हिरेमठ आणि जी एन सहस्त्रबुद्धे यांनी १९१२ मध्ये सहकारी साखर कारखान्याची संकल्पना मांडली . पहिला सहकारी साखर कारखाना १९१८ मध्ये The Neera Valley Cooperative Sugar Factory बारामती , पुणे जिल्ह्यात सुरु झाला. तो थोड्या दिवसामध्ये बंद झाला .१९३३ -१९३४ च्या कालावधीमध्ये सहा नवीन कारखाने सुरु झाले . १९४१ पर्यंत बारा साखर कारखाने महाराष्टामध्ये अस्तित्वात होते. १९५० मध्ये डॉ . विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरा येथे सहकारी साखर कारखाना सुरु केला . सहकारी तत्वावरील हा साखर कारखाना एक मैलाचा दगड ठरला . २००९- २०१० पर्यंत १९९ साखर कारखाने अस्तित्वात होते त्यापैकी १४२ कारखाने

व्हाळू स्थिती मध्ये होते. स्वातंत्र्याच्या अगोदर एकही सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नव्हता . १९४८ मध्ये अहमदनगर जिल्हयामध्ये पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरा नगर येथे सुरु झाला . त्यानंतर भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर सहकारी तत्वावर साखर कारखाने सुरु झालेले दिसून येतात . भारतामध्ये २०२२-२३ मध्ये ५३२ साखर कारखाने दिसून येतात .

**संबंधित साहित्याचा आढावा :**

१. खर्चे आर .एम .(१९८६ ) "मराठवाड्यातील साखर उद्योगापुढील समस्यांचा अभ्यास " संशोधकाने साखर उद्योगापुढील समस्यांचा ऊस पुरवठा, कमी दिवस गाळप व महाराष्ट्रातील इतर कारखान्यापेक्षा कमी चालतो असा तुलनात्मक अभ्यास केला आहे. मराठवाड्यातील २२ कारखान्याचा अभ्यास केला आहे.
२. श्री.भाऊसाहेब जानकीराम भंडारे (२०१६) यांनी " नाशिक जिल्ह्यातील ऊस उत्पादन व साखर उतारा यातील संबंधांचे आर्थिक अध्यायन (२००१-१०) या विषयावर संशोधन केले आहे. नाशिक जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यातील प्र्ती व खर्चाचा आढावा, ऊस उत्पादन व साकार उतारा यातील परस्पर संबंधांचा अभ्यास केला.

**उद्दिष्टे :**

१. भारतातील व महाराष्ट्रातील ऊस गाळप,साखर उत्पादन साखर उताराचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**महाराष्ट्रातील क्षेत्रनिहाय विभागणी :**

महाराष्ट्र हे सहकारी साखर उद्योगाच्या स्थापनेबाबत प्रथम राज्य मानले जाते. १९४८ मध्ये पहिला साखर कारखाना स्थापन केला. या सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून राज्यामध्ये क्षेत्रनिहाय विभाजन केलेले आहेत.

१. कोल्हापूर विभाग; कोल्हापूर , सांगली.
२. पुणे विभाग – सातारा व पुणे
३. सोलापूर- उस्मानाबाद (धाराशिव), सोलापूर.
४. अहमदनगर (अहिल्यानगर)- अहमदनगर (अहिल्यानगर), नाशिक.
५. औरंगाबाद (संभाजीनगर)- धुळे, जळगाव, नंदुरबार, औरंगाबाद, जालना, बीड.
६. नांदेड- परभणी, हिंगोली,नांदेड,लातूर.
७. अमरावती- बुलढाणा,यवतमाळ,अमरावती.
८. नागपूर- वर्धा,नागपूर भंडारा.

वरील प्रमाणे क्षेत्रीय साखर आयुक्तांची नियुक्ती केली जाते. मुख्य साखर आयुक्तालय पुणे येथे स्थापित आहे.

**भारताचे ऊस गाळप** :

| अ.क्र. | तपशील | गाळप हंगाम | |
|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२१-२२ |
| १. | चालू स्थितीतील साखर कारखाने | ५३२ | ५२४ |
| २. | ऊस गाळप (दशलक्ष टन) | ३३१.२० | ३५४.९१ |
| ३. | साखर उत्पादन (दशलक्ष टन) | ३२.९७१ | ३५.९४५ |
| ४. | साखर उतारा (%) | ९.९५ | १०.३३ |

**महाराष्ट्रातील ऊस गाळप :**

| अ.क्र. | तपशील | गाळप हंगाम | |
|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२१-२२ |
| १. | चालू स्थितीतील साखर कारखाने | २११ | २०० |
| २. | ऊस गाळप (दशलक्ष टन) | १०५.३९१ | १३२.२३ |
| ३. | साखर उत्पादन (दशलक्ष टन) | ११.८८६ | १४.९२७ |
| ४. | साखर उतारा (%) | ११.२८ | ११.२९ |

तुलानात्क दृष्ट्या विचार केला असता भारतामध्ये महाराष्ट्रात ५०% साखर कारखान्याची संख्या असलेल दिसून येते. देशात २०२३ मध्ये ५३२ साखर कारखाने होते. तर महाराष्ट्रात २११ साखर कारखाने असलेले दिसून येतात.

देशात ऊस गाळप ३३१.२० दशलक्ष टन गाळप झाले तर महाराष्ट्रात १०५.३९१ दशलक्ष टन गाळप झाले. देशात साखर उत्पादन ३२.९७१ दशलक्ष टन झाले तर महाराष्ट्रात ११.८८६ दशलक्ष टन उत्पादन झाले.

साखर उतराच्या बाबतीत सुद्धा देशाचा साखर उतारा ९.९५% असलेला दिसून येतो तर महाराष्ट्राचा साखर उतारा ११.२८ % असलेला दिसून येतो. म्हणजेच देशाच्या उताऱ्या पेक्षा महाराष्ट्राचा साखर उतारा जास्त असलेला दिसून येतो.

**भारतातील प्रमुख ऊस उत्पादक राज्यांचे साखर उत्पादनात योगदान (%) २०२२-२३ :**

| अ.क्र. | राज्य | योगदान (%) |
|---|---|---|
| १. | उत्तरप्रदेश | ३२.४५ |
| २. | महाराष्ट्र | ३२.०५ |
| ३. | कर्नाटक | १६.९८ |
| ४. | तमिळनाडू | ४.२५ |
| ५. | गुजरात | ३.०६ |
| ६. | हरियाणा | २.२७ |
| ७. | पंजाब | २.०२ |
| ८. | इतर | ६.९२ |

**महाराष्ट्रातील प्रमुख ऊस उत्पादक जिल्ह्याचे साखर उत्पादनात योगदान (%) २०२२-२३ :**

| अ.क्र. | राज्य | योगदान (%) |
|---|---|---|
| १. | सोलापूर | १५.८७ |
| २. | कोल्हापूर | १५.५२ |
| ३. | पुणे | १२.१७ |
| ४. | अहमदनगर | ११.५७ |
| ५. | सातारा | १०.१० |
| ६. | सांगली | ८.५४ |
| ७. | उस्मानाबाद | ४.४८ |
| ८. | लातूर | ४.१४ |
| ९ | बीड | ३.७० |
| १० | परभणी | २.६१ |
| ११ | जालना | २.२७ |
| १२ | इतर | ९.०१ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की देशाच्या बाबतीत उत्तरप्रदेश महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्याचे योगदान जास्त आहे.

महाराष्ट्राच्या बाबतीत सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहमदनगर आणि सातारा या जिल्ह्याचे साखर उत्पादांत जास्त योगदान दसते म्हणजेच पश्चिम महाराष्ट्राचे योगदान जास्त आहे.

**सारांश:**

वरील सर्व माहितीच्या आधारावर असे म्हणता येते की देश्याच्या साखर उत्पादनात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे तर उत्तरप्रदेश साखर

उत्पादांत पहिल्या क्रमांकावर असलेला दिसून येतो.तरीपण महाराष्ट्रात सर्वात जास्त साखर कारखाने असलेले दिसून येतात. साखर उताऱ्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर असलेले दिसून येते.

**संदर्भः**

१. chinimandi.com
२. vasndada sugar institute pune
३. Dilip Shinde International Journal of Applied Research Growth and Productivity of co-operative Sugar Factory in Maharashtra.